# शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद पालघर

## " जाहिरात "

जा.क्र./पाजिप/शिक्षण/प्राथ./आस्था/वशी-५२७/२०२४/११४७ दिनांक- २९/०७/२०२४

सेवा निवृत्त झालेल्या शिक्षकांमधून व अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ नुसार पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणी अंती पात्र ठरलेल्या उमेदवारांमधून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करणेकरिता दि. ३०/०७/२०२४ ते दि.०६/०८/२०२४ पर्यंतअर्ज मागविण्यात येत आहेत. विस्तृत जाहिरात, अर्जाचे नमुने व इतर प्रारूप www.zppalghar.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(संगीता भागवत )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद पालघर

(भानुदास पालवे, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

Scanned with CamScanner

# शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद पालघर

" जाहिरात "

जा.क्र./पाजिप/शिक्षण/प्राथ./आस्था/वशी-५२९/२०२४/११४५९ दिनांक- २९ /०७/२०२४

**पालघर जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत.**

**संदर्भ:- शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडील शासन पत्र क्रमांक: संकीर्ण २०२४/ प्र. क्र. ४१४/ टीएनटि-१, दि.१५/०७/२०२४**

संदर्भीय शासन पत्रानुसार पेसा क्षेत्रातील रिक्त पदे असलेल्या शाळांमध्ये नियमित शिक्षकांची भरती होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता स्थानिक पातळीवर शिक्षक पदासाठी पात्रता धारण करणारे खालीलप्रमाणे इच्छुक उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणेबाबत.

१. शासनामार्फत नियमित शिक्षकांची नियुक्ती होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या करिता शासन तरतुदीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या १००% अनुदानित शाळेतील सेवानिवृत्त शिक्षकांमधून इच्छुक शिक्षकांना तात्पुरत्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देणेकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. तसेच रिक्त पदांच्या तुलनेत सेवानिवृत्त शिक्षक उपलब्ध न झाल्यास शासन तरतुदीनुसार शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ नुसार पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणी अंती पात्र ठरलेल्या उमेदवारांमधून मानधन तत्वावर कंत्राटी पद्धतीने काम करण्यास तयार असलेल्या इच्छुक उमेदवारांना तात्पुरत्या कालावधीकरिता नियुक्ती देणेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**उपरोक्त जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे इच्छुक उमेदवारांचे अर्ज दि.०६/०८/२०२४** पर्यंत शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि. प. पालघर, नवीन जिल्हा परिषद इमारत, दालन क्रमांक-१७, कोळगाव, पालघर बोईसर रोड, पालघर (प.) या कार्यालयाच्या टपालामध्ये (आवक-जावक) सादर करण्यात यावेत. विस्तृत जाहिरात, अर्जाचे नमुने व इतर प्रारूप www.zppalghar.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. विहित मुदतीनंतर या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच या कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जांमधून पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या अधिकृत वेबसाईट प्रसिद्ध करण्यात येईल.

**(संगीता भागवत )**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद पालघर**

**(भानुदास पालवे, भा. प्र. से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

Scanned with CamScanner

# शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद पालघर

## " जाहिरात "

## सेवानिवृत्त शिक्षकांकरिता अटी व शर्ती

१. **वयोमर्यादा-** सदर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्ष राहील.

२. **मासिक मानधन-** मानधन रुपये २०,०००/-प्रतीमाह (कोणतेही इतर लाभा व्यतिरिक्त )

३. अर्जदार हा संबंधित नियुक्तीकरिता **शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम** असावा. (शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे. )

४. जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याशी अर्जदारास **करारनामा स्वाक्षरीत करणे** आवश्यक राहील.

५. **बंधपत्र / हमीपत्र:** नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने शिक्षकीय पदाचे विहित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, **या आशयाचे बंधपत्र / हमीपत्र देणे आवश्यक आहे.** या बंधपत्र / हमीपत्रामध्ये करार पद्धतीने नियुक्ती देतांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा तसेच करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा. **सदरचे बंधपत्र / हमीपत्र रुपये १००/- स्टॅम्पपेपर देण्यात यावे.**

६. पात्र व इच्छुक सेवा निवृत्त शिक्षकांनी **कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र** स्वतंत्रपणे सादर करावे.

७. वरीलप्रमाणे करण्यात आलेली **नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंतच असेल.**

८. अर्जदार सेवा निवृत्त शिक्षकांनी **विहित नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज (परिशिष्ट-अ) सादर करावा.** अर्जाच्या पाकीटावर **सेवा निवृत्त शिक्षक कंत्राटी पदाकरिता अर्ज** असे नमूद करावे.

९. पात्र व इच्छुक सेवा निवृत्त शिक्षकांनी आवेदन पत्र शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर (कार्यालय क्र. १७ ) **या कार्यालयात दि. ०६/०८/२०२४ रोजीपर्यंत सादर करावे. यानंतर आलेले आवेदन पत्र स्वीकारले जाणार नाहीत.**

(संगीता भागवत )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद पालघर

(भानुदास पालवे, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

Scanned with CamScanner

# शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद पालघर

## पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांकरिता अटी व शर्ती

१. **मासिक मानधन-** मानधन रुपये २०,०००/-प्रतीमाह (कोणतेही इतर लाभा व्यतिरिक्त )

२. जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याशी अर्जदारास **करारनामा स्वाक्षरीत करणे** आवश्यक राहील.

३. **बंधपत्र / हमीपत्र:** नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने शिक्षकीय पदाचे विहित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील, **या आशयाचे बंधपत्र / हमीपत्र देणे आवश्यक आहे.** या बंधपत्र / हमीपत्रामध्ये करार पद्धतीने नियुक्ती देतांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा तसेच कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यात आलेल्या उमेदवारांकडून सदर पदांवर कायम करणेबाबत भविष्यात कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा न्यायालयीन दावा करणार नसलेबाबत उल्लेख करणारे हमीपत्र / बांधपत्र लिहून देणे बंधनकारक असेल. **(सदरचे बंधपत्र / हमीपत्र रुपये १००/- स्टॅम्पपेपर देण्यात यावे.)**

४. पात्र व इच्छुक उमेदवारांवर **कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र** स्वतंत्रपणे सादर करावे.

५. जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेली **नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंतच असेल.**

६. अर्जदार उमेदवारांनी **विहित नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज (परिशिष्ट-ब) सादर करावा.** अर्जाच्या पाकीटावर **कंत्राटी शिक्षक पदाकरिता अर्ज** असे नमूद करावे.

७. पात्र व इच्छुक उमेदवारांनी आवेदन पत्र शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद पालघर (कार्यालय क्र. १७ ) **या कार्यालयात दि.०६/०८/२०२४ रोजीपर्यंत सादर करावे. यानंतर आलेले आवेदन पत्र स्वीकारले जाणार नाहीत.**

**८. शासनाद्वारे नियमित शिक्षक उपलब्ध झाल्यास कंत्राटी पद्धतीने शिक्षक पदी नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांना कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.**

(संगीता भागवत )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद पालघर

(भानुदास पालवे, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद पालघर

Scanned with CamScanner

## परिशिष्ट-अ

### जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवा निवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती
### (शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५)

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक ............................ दिनांक ..................................

**प्रति,**

| उमेदवाराचा अलिकडच्या काळातील पासपोर्टज साईज फोटो |
|---|

**जिल्हा निवड प्रक्रिया समिती**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, पालघर**

**विषय :- जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवा निवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती मिळणेबाबत.**

१. सेवा निवृत्त शिक्षकाचे नाव :- श्री./श्रीम.

..........................................................................................
(आडनाव) (स्वत:चेनांव) (वडीलांचे /पतीचेनाव)

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :- ..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. जन्मतारीख (शालान्त प्रमाणपत्रानुसार) :- ..........................................................................

४. प्रवर्ग :- ..........................................जात :-.......................................

५. ईमेलआयडी :- .............................................................................................

६. मोबाईल नंबर :- ...........................................................................

७. वय (दिनांक ३०/०६/२०२३ रोजी) .................. वर्ष ..................महिना..................दिवस

८. निवृत्ती वेळचे पदनाम- ----------------------------------------

९. अध्यापनाचे माध्यम- ------------------------ (मराठी, उर्दू, हिंदी व गुजराती )

१०. अध्यापन इयत्ता प्रकार - ---------------------- (इयत्ता १ ते ५ / इयत्ता ६ ते ८ )

Scanned with CamScanner

११. अर्जा सोबत सादर करावयाचे प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती * (आवश्यक)

| अ.क्र. | **सादर करावयाचे प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती** | |
|---|---|---|
| १. | आधार कार्ड. | |
| २. | जन्माचा दाखाला / सेवा पुस्तकाचे पहिले पान | |
| ३. | डी. एड. / बी. एड. गुणपत्रिका व प्रमाणपत्राची छायांकित प्रत | |
| ४. | सेवा निवृत्तीचा आदेश | |
| ५. | शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र | |
| ६. | स्वाक्षरीत करारनामा | |
| ७. | बंधपत्र / हमीपत्र | |

## प्रतिज्ञापत्र

मी शपतपूर्वक प्रमाणित करतो / करते की,

१. सदर अर्जात व अर्जासोबत सादर केलेली माहिती खरी आहे.

२. माझी यापूर्वी कोणत्याही सिदध अपराध गुन्हयात सहभाग नाही अथवा अशा गुन्हयाबाबत शिक्षा किंवा न्यायालयात खटला प्रलबित नाही.

३. मी जिल्हा परिषद पालघर / पंचायत समिती / ग्रामपंचायत येथे सदस्य नसुन या पैकी कुठल्याही संस्थेसोबत माझे व्यावयिक (पूरवठादार / कंत्राटदार) संबंध थेट किंवा भागीदारीत नाहीत.

४. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी नियुक्ती रद्द करण्यात यावी. तसेच माझ्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात यावी. त्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

दिनांक :-

स्थळ :- **(सेवा निवृत्त शिक्षकाचे नाव स्वाक्षरी)**

Scanned with CamScanner

# परिशिष्ट-ब

## पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांकरिता विनंती अर्ज
## (शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५)

प्रति,

जिल्हा निवड प्रक्रिया समिती
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, पालघर

| उमेदवाराचा अलिकडच्या कालातील पासपोर्टज साईज फोटो |
|---|

**विषय :- पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांकरिता जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती मिळणेबाबत.**

१. उमेदवाराचे नाव :- श्री./श्रीम.

.....................................................................................

(आडनाव) (स्वत:चेनांव) (वडीलांचे /पतीचेनाव)

२. पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) :-

.....................................................................................

.....................................................................................

३. जन्मतारीख (शालान्त प्रमाणपत्रानुसार) :- ..........................................................................

४. प्रवर्ग :- ..........................................जात :-........................................

५. ईमेलआयडी :- ......................................................................................

६. मोबाईल नंबर :- ...........................................................................

७. वय (दिनांक ३०/०६/२०२४ रोजी) ................... वर्ष ...................महिना...................दिवस

८. राज्यस्तरीय प्राप्त यादीतील अनु. क्र. - ----------------------------------------

९. जिल्हा स्तरीय अंतिम पात्र यादीतील अनु. क्र. ---------------------------------

१०. पात्र ठरलेला नियुक्तीचा गट (१ ली ते ५ वी / ६ वी ते ८ वी )-------------------------------

११. उमेदवार पदवीधर ( ६ वी ते ८ वी )असल्यास पात्र ठरलेला विषय.-----------------------------------------

१२. हमीपत्र/ बंधपत्र व करारनामा अर्जासोबत जोडले आहे / नाही.------------------------------------

दिनांक :-

स्थळ :-

(उमेदवाराचे नाव स्वाक्षरी)

Scanned with CamScanner

# बंधपत्र / हमीपत्र

मी श्री./ श्रीम. ..........................................................., सेवा निवृत्त शिक्षक असे बंधपत्र / हमीपत्र लिहून देतो / देते की, नियुक्तीच्या कालावधीत कंत्राटी पद्धतीने शिक्षकीय पदाचे विहित काम पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील, तसेच कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देतांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मला मान्य असतील, तसेच मी नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही.

**(सेवा निवृत्त शिक्षकाचे नाव स्वाक्षरी)**

Scanned with CamScanner

# बंधपत्र / हमीपत्र

मी श्री./ श्रीम. ..............................................................., पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरलेला उमेदवार असे बंधपत्र / हमीपत्र लिहून देतो / देते की, नियुक्तीच्या कालावधीत कंत्राटी पद्धतीने शिक्षकीय पदाचे विहित काम पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील, तसेच कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देतांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मला मान्य असतील, तसेच मी नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही.

**(पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरलेला उमेदवाराचे नाव स्वाक्षरी)**

Scanned with CamScanner

# सेवा करारनामा

आज दिनांक.     /     /२०२४ रोजी खालील प्रमाणे करार केला.

**मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
**जिल्हा परिषद पालघर**

**या करारासाठी पक्ष क्रमांक १**

...आणि...

करार सेवा निवृत्त शिक्षकाचे नाव ......................................................................................वय..........वर्ष
पत्ता.......................................................................................................................................

**या करारासाठी पक्ष क्रमांक २**

सदर सेवा कराराचे नियमन करणाऱ्या अटी/शर्ती खालीलप्रमाणे असतील.

१. करार सेवा निवृत्त शिक्षकाचे नाव ..........................................................................................पक्ष क्र.२ यांची नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत असेल. त्यानुसार त्यांचा कामाचा कालावधी असेल अथवा शासनामार्फत निर्गमित होणाऱ्या सूचनांच्या अधीन राहून करण्यात येत आहे.
२. सहशिक्षक / पदवीधर शिक्षक म्हणून असणारी विहित कामे करणे हे पक्ष क्र.२ ला बंधनकारक राहतील.
३. सदर काम हे कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन कामाचे दिवशी अथवा आवश्यकतेनुसार सुटीच्या दिवशी सुद्धा पूर्ण करावी लागेल व यास पक्ष क्र.२ यांची मान्यता राहील.
४. सदर कामासाठी पक्ष क्र.१ हे पक्ष क्र.२ यांना प्रतिमास रु.२०,०००/- (वीस हजार मात्र) इतके मानधन अदा करेल व सदर सेवा कराराचे कालावधीत मानधनात बदल होणार नाही.
५. सदर सेवा करार पक्ष क्र.२ एक महिन्याच्या पूर्व सूचनेने समाप्त करता येईल. एक महिन्याची पूर्व सूचना न दिल्यास एक महिन्याचा पगार जमा करावा लागेल हि अट पक्ष क्र. २ ला मान्य आहे.
६. पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ यांचे कार्यालयात प्राधिकृत केलेले अधिकारी यांचे नियंत्रणाखाली स्वतःच्या जबाबदारीवर काम करेल व कराराचे कालावधीत कोणत्याही तऱ्हेच्या अनपेक्षित कारणामुळे अथवा झालेल्या अपघातामुळे त्यास कोणत्याही प्रकारची शारीरिक व मानसीक इजा झाल्यास त्यासाठी पक्ष क्र. १ कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.
७. पक्ष क्र. २ कार्यालयामध्ये काम करण्यासाठी वक्तशीरपणे व नियमित उपस्थित राहील, तसेच पक्ष क्र. २ ची कार्यालयातील वर्तणूक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्याचे उत्तरदायित्व पक्ष क्र. १ च्या सर्व हितसंबंधाची रक्षा करणेचे राहील.
८. पक्ष क्र. १ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम व सूचना पक्ष क्र. २ वार बंधनकारक राहतील व त्याचप्रमाणेविहित केलेल्या गुणवत्तेनुसार पक्ष क्र. २ कडून काम न झाल्यास पक्ष क्र. १ चे निर्देशनास आल्यास सदर सेवा करार तात्काळ रद्द करण्याचे अधिकार पक्ष क्र. १ कडे राहतील .

Scanned with CamScanner

९. पक्ष क्र. २ या सेवा कराराचे कालावधीत अन्ये ठिकाणी कोणतेही काम स्वीकारण्यास मनाई राहील.

१०. पक्ष क्र. २ यांच्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोपपत्र नसल्याचे प्रमाणपत्र स्वतंत्र सादर करावे लागेल.

११. या सेवा करारपत्राचे कोणत्याही कलमाबाबत वा अन्य कोणत्याही नियमाबाबत विवाद निर्माण झाल्यास पक्ष क्र. १ चा निर्णय अंतिम राहील व त्याबाबत कोणत्याही तर्हेची तक्रार / सूचनेची दखल घेतली जाणार नाही.

१२. पक्ष क्र. २ यांची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पद्धतीने असल्यास भविष्यात पूर्णनियुक्ती अथवा पदस्थापन कामी किंवा वरिष्ठ प्राधिकरणाकडे तसेच न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार पक्ष क्र. २ यास राहणार नाही.

१३. पक्ष क्र. २ यांना जिल्हा परिषद यंत्रणेकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व आदेश बंधनकारक राहतील.

१४. पक्ष क्र. २ यांनी १ ते १३ पैकी कोणत्याही अटी / शर्तीचा भंग केल्यास कोणताही पूर्वसूचना न देता आदेश रद्द करण्याचे अधिकार पक्ष क्र. १ यांना राहतील.

१५. पक्ष क्र.२ यांना तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पद्धतीने देण्यात आलेली नियुक्ती ही शैक्षणिक वर्षाकरिता असेल.

**दिनांक:- / /२०२४** **(सेवा निवृत्त शिक्षकाचे नाव स्वाक्षरी)**

पक्ष क्र. २

दिनांक : स्वाक्षरी

(नाव.................................................................)

पक्ष क्र. १

साक्षीदार

१) ...................................................................

२) ...................................................................

Scanned with CamScanner

# सेवा करारनामा

आज दिनांक.    /    /२०२४ रोजी खालील प्रमाणे करार केला.

**मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
**जिल्हा परिषद पालघर**

**या करारासाठी पक्ष क्रमांक १**

...आणि...

करार पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरलेला उमेदवाराचे नाव
श्री. / श्रीम. ..........................................................................वय..........वर्ष
पत्ता..........................................................................................................

**या करारासाठी पक्ष क्रमांक २**

सदर सेवा कराराचे नियमन करणाऱ्या अटी/शर्ती खालीलप्रमाणे असतील.

१. करार पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरलेला उमेदवाराचे नाव..........................................................................पक्ष क्र.२ यांची नियुक्ती नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत असेल. त्यानुसार त्यांचा कामाचा कालावधी असेल अथवा शासनामार्फत निर्गमित होणाऱ्या सूचनांच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

२. सहशिक्षक / पदवीधर शिक्षक म्हणून असणारी विहित कामे करणे हे पक्ष क्र.२ ला बंधनकारक राहतील.

३. सदर काम हे कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन कामाचे दिवशी अथवा आवश्यकतेनुसार सुटीच्या दिवशी सुद्धा पूर्ण करावी लागेल व यास पक्ष क्र.२ यांची मान्यता राहील.

४. सदर कामासाठी पक्ष क्र.१ हे पक्ष क्र.२ यांना प्रतिमास रु.२०,०००/- (वीस हजार मात्र) इतके मानधन अदा करेल व सदर सेवा कराराचे कालावधीत मानधनात बदल होणार नाही.

५. सदर सेवा करार पक्ष क्र.२ एक महिन्याच्या पूर्व सूचनेने समाप्त करता येईल. एक महिन्याची पूर्व सूचना न दिल्यास एक महिन्याचा पगार जमा करावा लागेल हि अट पक्ष क्र. २ ला मान्य आहे.

६. पक्ष क्र. २ हे पक्ष क्र. १ यांचे कार्यालयात प्राधिकृत केलेले अधिकारी यांचे नियंत्रणाखाली स्वतःच्या जबाबदारीवर काम करेल व कराराचे कालावधीत कोणत्याही तऱ्हेच्या अनपेक्षित कारणामुळे अथवा झालेल्या अपघातामुळे त्यास कोणत्याही प्रकारची शारीरिक व मानसीक इजा झाल्यास त्यासाठी पक्ष क्र. १ कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही.

७. पक्ष क्र. २ कार्यालयामध्ये काम करण्यासाठी वक्तशीरपणे व नियमित उपस्थित राहील, तसेच पक्ष क्र. २ ची कार्यालयातील वर्तणूक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्याचे उत्तरदायित्व पक्ष क्र. १ च्या सर्व हितसंबंधाची रक्षा करणेचे राहील.

Scanned with CamScanner

८. पक्ष क्र. १ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम व सूचना पक्ष क्र. २ वार बंधनकारक राहतील व त्याचप्रमाणेविहित केलेल्या गुणवत्तेनुसार पक्ष क्र. २ कडून काम न झाल्यास पक्ष क्र. १ चे निर्देशनास आल्यास सदर सेवा करार तात्काळ रद्द करण्याचे अधिकार पक्ष क्र. १ कडे राहतील .

९. पक्ष क्र. २ या सेवा कराराचे कालावधीत अन्ये ठिकाणी कोणतेही काम स्वीकारण्यास मनाई राहील.

१०. पक्ष क्र. २ यांच्यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोपपत्र नसल्याचे प्रमाणपत्र स्वतंत्र सादर करावे लागेल.

११. या सेवा करारपत्राचे कोणत्याही कलमाबाबत वा अन्य कोणत्याही नियमाबाबत विवाद निर्माण झाल्यास पक्ष क्र. १ चा निर्णय अंतिम राहील व त्याबाबत कोणत्याही तर्हेची तक्रार / सूचनेची दखल घेतली जाणार नाही.

१२. पक्ष क्र. २ यांची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पद्धतीने असल्यास भविष्यात पूर्णनियुक्ती अथवा पदस्थापन कामी किंवा वरिष्ठ प्राधिकरणाकडे तसेच न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार पक्ष क्र. २ यास राहणार नाही.

१३. पक्ष क्र. २ यांना जिल्हा परिषद यंत्रणेकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व आदेश बंधनकारक राहतील.

१४. पक्ष क्र. २ यांनी १ ते १३ पैकी कोणत्याही अटी / शर्तीचा भंग केल्यास कोणताही पूर्वसूचना न देता आदेश रद्द करण्याचे अधिकार पक्ष क्र. १ यांना राहतील.

१५. पक्ष क्र.२ यांना तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पद्धतीने देण्यात आलेली नियुक्ती ही शैक्षणिक वर्षाकरिता असेल.

**दिनांक:- / /२०२४**

**(पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरलेला उमेदवाराचे नाव नाव स्वाक्षरी)**
**पक्ष क्र. २**

(नाव............................................................)
पक्ष क्र. १

साक्षीदार

१)..............................................................

२)..............................................................

Scanned with CamScanner